**पूर्व मान्यतेसाठी**

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जयदिप मेटालिक्स एन्ड अलॉईज प्रायव्हेट लिमिटेड , गट नं. ७३, ७४, ७६, ७८, ७९, ८०, १७९ व १८०, लखमापूर गाव, भिवंडी वाडा रोड, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर यांच्या कार्यरत प्रकल्पात सद्याच्या १०.० टन प्रवर्तन भट्टीच्या ठिकाणी १५.० टन प्रवर्तन भट्टी स्थापित करणे व एक १X३० टनची अतिरिक्त प्रवर्तन भट्टी स्थापन करुन एम.एस. बिलेट्सचे उत्पादन १,८४,५००.० टीपीए ते ३,५०,००० टीपीए पर्यत वाढविणे तसेच रोलिंग मिलव्दारे टीएमटी बार्सचे उत्पादन ७२,००० टीपीए ते ३,५०,००० टीपीए वाढविणे प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जयदिप मेटालिक्स एन्ड अलॉईज प्रायव्हेट लिमिटेड , गट नं. ७३, ७४, ७६, ७८, ७९, ८०, १७९ व १८०, लखमापूर गाव, भिवंडी वाडा रोड, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर यांच्या कार्यरत प्रकल्पात सद्याच्या १०.० टन प्रवर्तन भट्टीच्या ठिकाणी १५.० टन प्रवर्तन भट्टी स्थापित करणे व एक १X३० टनची अतिरिक्त प्रवर्तन भट्टी स्थापन करुन एम.एस. बिलेट्सचे उत्पादन १,८४,५००.० टीपीए ते ३,५०,००० टीपीए पर्यत वाढविणे आणि रोलिंग मिलव्दारे टीएमटी बार्सचे उत्पादन ७२,००० टीपीए ते ३,५०,००० टीपीए वाढविणे प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थान गट नं. ७३, ७४, ७६, ७८, ७९, ८०, १७९ व १८०, लखमापूर गाव, भिवंडी वाडा रोड, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री देविदास कोपरकर, उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री दिलीप गुट्टे, अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक

जाहिर जनसुनावणी समिती, डॉ उध्दव कदम, तहसीलदार, वाडा तहसील, जिल्हा-पालघर, श्री बाबासाहेब कुकडे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने काही निर्देश पारित केलेले आहेत. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जयदिप मेटालिक्स एन्ड अलॉईज प्रायव्हेट लिमिटेड , गट नं. ७३, ७४, ७६, ७८, ७९, ८०, १७९ व १८०, लखमापूर गाव, भिवंडी वाडा रोड, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर यांच्या कार्यरत प्रकल्पात सद्याच्या १०.० टन प्रवर्तन भट्टीच्या ठिकाणी १५.० टन प्रवर्तन भट्टी स्थापित करणे व एक १X३० टनची अतिरिक्त प्रवर्तन

भट्टी स्थापन करुन एम.एस. बिलेट्सचे उत्पादन १,८४,५००.० टीपीए ते ३,५०,००० टीपीए पर्यंत वाढविणे आणि रोलिंग मिलव्दारे टीएमटी बार्सचे उत्पादन ७२,००० टीपीए ते ३,५०,००० टीपीए पर्यंत वाढविणे प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब-१ शेड्युल ३ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी अर्ज दिनांक २४/०३/२०२२ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिनांक २५/०४/२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) घेण्यास गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या

कार्यालयीन आदेश क्रं. ई-४५/२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०६३०-एफटीएस-०१३१ दिनांक ३०-०६-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पालघर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण

३) उप प्रादेशिक अधिकारी,कल्याण-३ - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र फ्री पेस यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक २०-०६-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते —

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर

२) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर

५) उप विभागीय अधिकारी-वाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर

६) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

७) उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम) – ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२,

१०) तहसीलदार, तहसील कार्यालय,वाडा,, जिल्हा- पालघर,

११) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर,

१२) सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, लखमापूर,तालुका-वाडा, जिल्हा-पालघर

१३) संकेतस्थळ, म.प्र.नि.मंडळ

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म.प्र.नि. मंडळास ईमेलव्दारे व पत्राव्दारे काही आक्षेप प्राप्त झालेले आहेत व त्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय विभाग, मंबई यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक

विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/स्पष्टीकरण/आश्वासनः —**

१) **श्री वैभव शरद डोहाळे, राहणार-किनईपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

प्रकल्पापासून आमचे गाव फक्त २०० मीटर्स अंतरावर आहे. या कंपनीमुळे आम्हांला त्रास होतो. या २०० मीटर्स अंतरावर जिल्हा परिषदेची १ली ते ५वी पर्यंतची शाळा आहे. त्याचप्रमाणे अंगणवाडीसुध्दा भरते. येथे या कंपनीबरोबरच दुस-या सात कंपन्या आहेत. त्या सर्व कंपन्यामधील प्रदूषणामुळे परिसरातील लोकांना श्वसनाचा फारच त्रास होतो. सतत आजारी पडतात. या प्रकल्पात स्थानिक रोजगाराची संधि देण्यात येत नाही.

२) **श्री देवेन्द्र दिनेश वाघ, राहणार-किनईपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

सादरीकरणात परिसरातील गावे घेतलेली असून आमचे किनईपाडा हे गाव प्रकल्पापासून फक्त २०० मीटर्स अंतरावर असून ते लखमापूर महसूल गावात येते. या कंपनीने जे काही पर्यावरण सर्वेक्षण केले, ते कधी व कुठे केले हे किनईपाडा गावातील लोकांना माहिती नाही. जर लखमापुर ८०० मीटर्स अंतरावर आहे, तर किनईपाडा हा गाव फक्त २०० मीटर्स अंतरावरच आहे. तरी आमच्या गावातही सर्वेक्षण व सहमती घेणे आवश्यक होते. आम्ही स्थानिक नाहीत का?

या बैठकीची सूचना स्थानिकांनी एकमेकांना पाठविली, नाहीतर गावातील लोकांना काहीही माहिती नव्हती. या कंपनीच्या प्रदूषणामुळे आम्हांला खूपच त्रास होतो. विस्तारिकरणासाठी अतिरिक्त भट्टी कार्यान्वित करावी लागेल, त्यामुळे धुर जास्त वाढेल व तो वा-याबरोबर मिसळून आम्हांला खूपच त्रास होईल.

**३) श्री नितेश बबन पाटील, राहणार-किनईपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

आमचे किनईपाडा गाव हे प्रकल्पा पासून फक्त २०० मीटर्स अंतरावर आहे. येथील कंपन्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूर उत्पन्न होतो व त्यामुळे स्थानिकांना ब-याच प्रमाणात त्रास होतो. या कंपनीच्या विस्तारीकरणामुळे त्या त्रासात अजून भर पडेल. आमची लहान मुले असून त्यांना अगोदरच श्वसनाचा त्रास होत आहे. या धुरामुळे बराच त्रास त्यांनाही होत आहे.

प्रकल्प अहवालात किनईपाडा हे गाव दाखविण्यात आलेले नाही, किनईपाडा व तेथील परिसरातील शाळासुध्दा दाखविण्यात आलेल्या नाहीत, तर ३५० मीटर्सवरील पावलीपाडा हे गांव दाखविण्यात आलेले आहे. तसेच येथे इतर कंपन्या कार्यान्वित आहेत, त्यांचा उल्लेखही नाही. प्रकल्पात स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येत नाही.

**४) श्री दिनेश पाटील, राहणार-किनईपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

या कंपनीला लागूनच माझी पाच एकरांची शेतजमिन आहे. या कंपनीच्या धुरामुळे आम्हांला जगणे मुश्किल झालेले आहे. आज कंपनी बंद ठेवल्यामुळे येथे धुर नाही. या धुराच्या त्रासामुळे येथे स्थानिक शेतकामगार शेतावर कामास येण्यास तयार होत नाही. तरी या धुराचा बंदोबस्त झालाच पाहिजे.

याठिकाणी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पाची उभारणी ही लखमापूर गावात होत आहे. या प्रकल्पाचा परिणाम ५०० मीटर्स पर्यंत होऊ शकतो. लखमापुर गाव हे ५०० मीटर्सवर असल्याने लखमापूर गाव व परिसरात सर्वेक्षण करण्यात येऊन तेथील जल व हवेचे नमुने गोळा करण्यात आले व परिसरातील इतर गावांचा उल्लेख अहवालात करण्यात आलेला आहे. उपस्थितांनी सूचित केलेल्या चांदोली गावाचाही उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात आलेला आहे.

५)**श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबादः-**

मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे की जो औद्योगिक विकासास पाठिंबा देतो. माझ्या मते भारतातील बेरोजगारी हे सर्वात मोठे प्रदूषण आहे. मी प्रकल्प व्यवस्थापनाचे विस्तारिकरण व दोनशे व्यक्तींना रोजगाराची संधि देण्याबद्दल त्यांचे अभिनंदन करत आहे. माझ्या मते जवळजवळ २००० व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे. प्रकल्पात ज्याचे उत्पादन होणार आहे, त्यामुळे अप्रत्यक्ष सुमारे एक लाख लोकांना त्याचा फायदा होणार आहे.

श्री रेड्डी यांनी पुढे सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी जल, हवेचे सर्वेक्षण करुन योग्यप्रकारे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे. भारतातील बरेच पर्यावरणवादी हे लोकांच्या आरोग्याविषयक प्रश्नांसाठी कंपन्यांना दोष देतात. मात्र खते व कीटकनाशके हे सर्वात जास्त प्रदूषण करत आहेत. भारतातील सुमारे ४० कोटी वाहने हे सर्वात जास्त प्रदूषण करत आहेत. भारतातील जीवनशैली व अन्नाच्या सवयी बदलल्यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे. भारतात कंपन्या व खाणीभोवती फक्त १५% लोक राहत आहेत. तरी कंपन्यांना आरोग्यविषयक प्रश्नांना जबाबदार

धरण्यात येऊ नये. मी पर्यावरण,वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सदरहू प्रकल्पास विनाशर्त पर्यावरण अनुमती देण्याची विनंती करत आहे.

त्याचप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापनास विनंती करण्यात येते की प्रदूषण नियंत्रणाचे सर्व नियम पाळण्यात यावेत. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघात जल, हवा, मृद(माती) सर्वेक्षण केलेले आहे. मी विनंती करतो कि १० कि.मी. परिघातील आरोग्यस्थिती, पीक नमुना व सद्यस्थिती, भूगर्भातील पाण्याची सद्यस्थिती, पर्यावरणीय संतुलन याचा अभ्यास करण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रकल्प भोवतालच्या खेड्यात वृक्षारोपण व रस्त्याच्या दोन्हा बाजूस वृक्षारोपण करण्यात यावे. त्यामध्ये औषधी वनस्पती, फळे येणारा झाडे लावण्यात यावीत. हा उपक्रम सीएसआर निधीत राबविणे शक्य आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी एक समन्वयक समिती (Co-ordination Committee) गठित करुन त्यात स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानीक प्रदूषण नियंत्रण अधिकारी यांचा समावेश करण्यात येऊन जनतेस आवश्यक असणारे सामाजिक उपक्रम राबविण्यात यावा. स्थानिक युवक युवतींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. जर संबंधितांना या प्रकल्पात रोजगार मिळाला नाही, तर त्यांना दुस-या कंपनीत संधि मिळू शकते.

त्यांनी सांगितले की करोनाने जगाला एक नवी शिकवण दिली आहे. आरोग्यशिबिरांबरोबरच प्रत्येकाने स्वतःची रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. स्थानिकांना उपस्थित केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

प्रकल्प अधिकारी यांना यास उत्तर देताना सांगितले की करोनानंतर प्रकल्पातील सर्वांचा आरोग्य विमा काढण्यात आलेला आहे. विशिष्ट कालावधीनंतर (६-८ महिन्यांना) डॉक्टरांना बोलवण्यात येते व वैदकीय तपासणी करण्यात येते. प्रत्येकाचे हेल्थ कार्ड बनविण्यात आलेले आहे. आम्ही कौशल्यविकासासाठी प्रशिक्षण केंद्र उभारले आहे. सर्वांचा क्रमिक विकास करण्यात येत आहे.

६) **श्री विजय विलास पाटील, राहणार-लखमापूर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

मी लखमापूर गावाचा नागरिक असून नागरिक म्हणून संवाद साधत आहे. येथे ब-याच जणांनी प्रकल्पाबाबत आपल्या सूचना मांडल्या. त्यांना धन्यवाद. हा प्रकल्प २००९ सालापासून कार्यान्वित आहे. पण मला स्वतःला असे वाटले नाही की मला दमा झाला. काही लोकांनी आक्षेप नोंदविला की या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होते. समजा हे मान्य केले, तर प्रकल्पापासून माझे १०० मीटर्स अंतरावर दुकान आहे. १०० मीटर्सच्या पुढे माझी स्वतःची १०७ गटाची १६ एकर जागा आहे. तेथे आम्ही भात पिकवितो. भाताच्या पिकांवर काहीही परिणाम झालेला नाही. मग पर्यावरणाची हानी कशी झाली? आम्ही तेथे शेती पिकवितो. या कंपनीचा आमच्या गावातील कोणालाच याचा त्रास झालेला नाही. हे मी स्वखुशीने सांगत आहे. येथे काहीजणांनी कंपनी गावासाठी काहीह करत नाही असा आक्षेप नोंदविला. तर शाळेसाठी काहीही गरज लागली तर कंपनी पुरविते. पाण्याची गरज असेल तर ती पुरविते व प्रत्येक गावाचा विकास केलेला आहे. किनईपाडाच्या शाळेला पिण्याच्या पाण्याची व पेवर ब्लॉकची सोय ही कंपनीने केलेली आहे. काहींनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येत नाही. तर त्यास उत्तर म्हणजे किनईपाड्यातील लोक या प्रकल्पात कार्यान्वित आहेत. त्याचे सर्व रेकॉर्ड या कंपनीत आहे.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विलास पाटील यांना सूचना केली की त्यांनी स्वतःचे मत मांडावे. इतरांनी केलेल्या सूचना, आक्षेप यांना उत्तर देऊ नये.

श्री विलास पाटील यांनी सांगितले की माझी स्वतःची १०६ गट नंबरमध्ये आंब्याची वाडी आहे. त्याची काहीही हानी झालेला नाही.

७) **<u>श्री पुंडलिक श्रीधर पाटील, निवृत्त शिक्षक, राहणार-लखमापूर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-</u>**

ही कंपनी आली म्हणून येथील स्थानिकांना रोजगाराची संधि मिळालेली आहे. त्यामुळे या परिसरातील जे नोकरीसाठी स्थलांतर व्हायचे, त्यात घट झालेली आहे. येथील कातकरीवाडी ही वीटकामांसाठी १००% बाहेर जात असे. आता ते लोक येथेच राहतात. म्हणजे या प्रकल्पामुळे हजारो कुटुंबाचा उदरनिर्वाह होत आहे, हे विसरता कामा नये. कंपनीने येथे व शाळेत पेवर ब्लॉक पुरविले असून पिण्याच्या पाण्याची सोय केलेली आहे. मी शेतकरी असून माझी शेती प्रकल्पापासून थोड्या अंतरावरच आहे. येथे जेव्हा या कंपन्या आल्या, माझ्या शेताच्या उत्पादनात घट झालेली नाही. ज्यावेळी येथे सार्वजनिक कार्यक्रम असेल, त्यावेळी प्रकल्प अधिकारी हे आवर्जून भेट देतात. येथील स्थानिकांना प्रोत्साहित करण्याचे काम हे प्रकल्प अधिकारी करतात.

८) **<u>श्री नितेश पाटील, राहणार-किनई पाडा</u>** यांनी परत आक्षेप नोंदवित असताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत मा.अध्यक्ष यांच्या सूचनेप्रमाणे आपण आपले मत,सूचना, आक्षेप नोंदवावेत, दुस-यांनी केलेल्या सूचना, आक्षेपांवर टीकाटिप्पणी करु नये.

श्री नितेश पाटील यांना आक्षेप नोंदविला की गट नं.१०६ चा मी हिस्सेदार असून त्या जागेवर गेले ५-६ वर्षे कोणीही धान्य पिकविलेले नाही. तसेच आम्ही स्थानिक असून येथे उपस्थित सर्व स्थानिकांना धुराच्या त्रासाबद्दल विचारण्यात यावे. सदरहू प्रकल्प हा रात्रीच्या वेळी खूप धूर सोडत असतो. त्याचा व्हिडिओ काढण्यात आलेला आहे. विशेषत: लहान मुले व वयोवृध्दांना प्रचंड त्रास होतो.तरीही याबाबत कंपनीच्याविरुध्द काहीही कारवाई करण्यात आलेली नाही.

येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की बैठकीत झाडे लावण्याची सूचना करण्यात आलेली आहे. तर आम्ही परिसरातील ब-याच गावात वृक्षारोपण केलेले आहे. त्यातही जेवढे शक्य आहे, त्याठिकाणी फळे येणारे वृक्ष लावलेले आहेत. त्याची सविस्तर माहिती आमच्याकडे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे सांगितले की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी प्राथमिक व दुय्यम हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करण्यात आलेली आहे. बॅग फिल्टर सयंत्रणा कार्यान्वित आहे. पॅनेलला विजेचे मीटर लावलेले असून तो पूर्णवेळ कार्यान्वित असतो.

त्यांनी पुढे सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पात अत्यावश्यक असलेल्या सर्व अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्यामुळे चिमणीत सर्व धुर, धुलीकण हे गोळा करण्यात येतील. गावक-यांना काहीही त्रास होणार नाही. त्यांनी सांगितले की बॅग फिल्टरमुळे जे प्रदूषण नियंत्रण होते, त्याचा संपूर्ण डेटा आमच्याकडे उपलब्ध आहे. विस्तारिकरण प्रकल्पातही आम्ही ३३% हरितपट्टा विकसित करणार आहोत.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की प्रकल्पास मंजूर करण्यात आलेल्या संमती पत्राप्रमाणे जरी हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित असली, तरीही रुफ टॉपवर Secondary Emission System/Fume Extraction System धुर नियंत्रणासाठी त्वरित कार्यान्वित करण्याची आवश्यकता आहे. जर ही सयंत्रणा कार्यान्वित केली तर धुर नियंत्रणात येऊन परिसरातील लोकांना त्रास होणार नाही.

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी Secondary Emission System प्रकल्पात कार्यान्वित करण्याचे व भविष्यात ज्या ज्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज असेल, त्या कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले.

**९) श्री नितेश बाळकृष्ण पाटील, राहणार-लखमापूर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

माझी प्रकल्पाच्या काही अंतरावर जमिन असून मी झाडे लावलेली आहेत. आतापर्यंत त्या झाडांवर कुठलाच दुष्परिणाम दिसलेला नाही. त्यांनी पुढे सांगितले की करोना काळात कंपनीची खूपच मदत झाली. स्थानिकांना रोजगार मिळाला. कंपनीने दरवेळी सहकार्य केलेले आहे. या प्रकल्पाचा माझ्या गावाला काहीही त्रास नाही. मागच्या भट्टी उभारणीच्यावेळी आम्ही वृक्ष लागवडीची मागणी केली, ती त्यांनी पुर्ण केलेली आहे. त्यांनी पुढे मागणी केली की जर काही समस्या उद्‌भवली, तर त्याबाबत कंपनी व्यवस्थापनाने नवीन पर्याय काढावेत व स्थानिकांना सहकार्य करावे. जर स्थानिकांनी केलेल्या आक्षेपांनुसार जर प्रदूषणाचा त्रास होत असेल, तर कंपनी व्यवस्थापनाने त्याबाबत उपाय योजना कराव्यात.

१०)**श्री सचिन हरिभाऊ पाटील, राहणार-जामघर, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-**

स्थानिकांचा कुठल्याही प्रकल्पास विरोध नाही व नसणार. पण प्रकल्पासाठी पर्यावरणाचा -हास करतो व जनतेच्या उत्पन्नात भर टाकतो हे चुकीचे वाटते. प्रदूषण टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. येथे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा उल्लेख करण्यात आला. सर्वेक्षण हे डिसेंबर-जानेवारी या महिन्यात करण्यात आलेले आहे हे सादरीकरणात दाखविले. मात्र प्रदूषणाची पातळी ही उन्हाळयात वाढते, त्यामुळे सर्वेक्षण हे उन्हाळयात करणे गरजेचे होते.

त्यांनी सांगितले की सादरीकरणात पीएच ५.४ – ६.४ दरम्यात आहे. मात्र तसे नाही. कारण पावसाच्या पाण्याची पीएचही ५.४ आहे. त्यामुळे शंका येते की सादरीकरणात जे दाखविले, तसे प्रत्यक्षात नाही.

नंतर दाखविला एअर इन्डेक्स. पीएम १० हा २४ तासांसाठी आपण मोजमाप ०.५० असे केलेले आहे. ते चांगले आहे. पण येथे कंपन्या आल्यानंतर त्यात भिन्नता (variation) यायला लागली, जरी आता आपल्याला परिणाम जाणवणार नसला तरीही येथील लोकांच्या आरोग्यावर दूरगामी परिणाम हा १००% होणारच. तर त्यासाठी कंपनीने वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. तर ही अस्तित्वात असलेल्या कंपनीने केलेले वृक्षारोपणाचे काम लोकांपर्यंत पोहचलेले नाही.

त्याचप्रमाणे SO2 आणि Nox याचे प्रमाण दाखविले १३:९ व ९:१८. असे कसे होईल? एक कि.मी. अंतरात सारख्याच नैसर्गिक स्थिती असताना एक कि.मी. अंतरावर प्रमाण कसे बदलेल. औद्योगिक क्षेत्रात जे जे उत्पादन करणारे उत्पादके तयार करत असू, तर होऊ शकेल. खुपरी गावात SO2

आणि Nox प्रमाण २०:३ व १६:५. त्यामुळे आमची शंका वाढते. आम्ही कंपनीच्या विरुध्द नाही. कंपनी मोठी व्हावी.

आता रेन वॉटर हार्वेस्टींगचा वापर प्रकल्पात करणार असल्याचे सादरीकरणात दाखविले. तर पूर्वीच्या कार्यरत प्रकल्पात रेन वॉटर हार्वेस्टींग केले का हा प्रश्न आहे. जर केले, तर तुमचा स्वतःचा पाणी साठा का नाही? त्यांना गावातील पाण्याचा उपसा का करावा लागतो? जर दिवसाला १,९०,००० लीटर पाणी लागणार, भविष्यात जर उत्पादन वाढविले तर जादा पाणी लागेल, तर एवढा उपसा केल्यानंतर साहजिकच शेजारच्या गावातील पाण्याची पातळी देखील ही खालीच जाणार. याचा परिणाम हा भविष्यात होणार आहे.

पुढे सांगण्यात आले, रोजगार, उपक्रम सीईआर व सीएसआर निधीचा वापर. तर प्रकल्प विस्तारिकरणाचा प्रस्ताव तयार करताना सीएसआर निधीबाबत दर्शविण्यात आले, मुलतः त्याचा वापर अगोदरपासून करायला पाहिजे. त्यासाठी दरवर्षी एकच गाव घेऊन सीएसआर निधी हा त्या गावाच्या विकासासाठी वापरण्यात यावा.

सादरीकरणात दर्शविले की विस्तारिकरण प्रकल्पात ३३% हरित पट्टा विकसित करण्यात येईल. तर टेकडीवर जंगल होते. प्रकल्पासाठी आपण टेकडीवरिल झाडेच नष्ट केली. झाडे तोडण्याऐवजी पर्यायी व्यवस्था करता येणे आपणास शक्य होते. स्थानिक ती झाडे गेले २०-२५ वर्षांपासून पहात होते. ती झाडे मे महिन्यात तोडली, जेव्हा झाडावरील पक्षांचा प्रजनन काळ चालू असतो. झाडे प्रजनन काळात तोडली, त्यामुळे घरट्यात पक्षांची जी अंडी होती, ती नष्ट झाली. त्यामुळे स्थानिकांच्या भातशेतीतील किडे खाण्यास पक्षी नाहीत, म्हणजे पर्यायाने पीकांची हानी होणार. म्हणून

स्थानिक शेतकरी हा शेतात कीटकनाशके वापरतो. कीटकनाशकामुळे परत जल व हवा प्रदूषण होते. त्यामुळे विस्तारिकरण प्रकल्पातील भविष्यातील अभिवचनावर आमचा विश्वास नाही. आपल्याकडील जंगलतोडीमुळे पक्षी मेले, गेले. त्यामुळे अन्नशेतातील किडे कोण खाणार? हा प्रश्न आहे. वृक्षारोपण सर्वांनीच केले पाहिजे, ग्रामपंचायतीची ते प्राधान्यच असले पाहिजे.

कौशल्यविकासासाठी आपण शाळा/सेंटर ठेवलेले असेल. तर त्या कौशल्यविकासातून स्थानिक किती लोकांना रोजगाराची संधि प्रकल्पात मिळाली? त्याचप्रमाणे किती लोकांना या कौशल्यविकासाचा इतर प्रकल्पात फायदा झाला?

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की आपण जे प्रकल्प विस्तारिकरण ३०% करणार आहे, तर त्यातून उत्पन्न होणा-या कच-यातून/वेस्टमधून ज्यास स्लॅग म्हटले जाते, त्याने प्रकल्पातील अंतर्गत रस्ते तयार करण्यात येतील. म्हणजे एक महिन्याच्या वेस्टमधून ते तयार झाल्यानंतर पुढचे नियोजन काय आहे? त्यासाठी पर्याय करुन ठेवला आहे काय? सादरीकरणात त्याचा उल्लेख नाही. उत्पादन प्रक्रियेत १,९०,०० लिटर प्रति दिन पाणी वापरणार आहात. त्याचा पुनर्वापर करण्यात येईल एवढेच सांगण्यात आले. त्यासाठी कोणती प्रक्रिया करण्यात येईल, त्यासाठी कोणत प्लान्ट आहे याची माहिती नाही व पुनर्वापरातून परत वेस्ट तयार होते. त्याचे काय करणार? याची माहिती सादरीकरणात देण्यात आलेली नाही. तरी सर्वांनाच विश्वासात घेऊन काम केले, तर स्थानिक आपणास विरोध करणारा नाही. सगळ्ञानांच रोजगार हवा आहे. तर कंपनी प्रदूषण नियंत्रण, रोजगार, सीएसआर निधी, सीईआर निधी याबाबत ठोस

आश्वासन व योजना देत नाही, तोपर्यंत ही प्रकिया ही स्थगित ठेवण्यात यावी.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रत्येक मुद्द्यांनुसार उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना सांगितले की श्री सचिन हरिभाऊ पाटील यांनी झाडे कापण्याबाबत आक्षेप नोंदविलेला आहे. तर २-३ झाडे कापली गेली असतील, मात्र आम्ही हजारो झाडे लावलेली आहेत. गावातील इतर सेवाभावी संस्था, लॉयन्स क्लब, ग्रामपंचायत यांना विश्वासात घेऊन वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. प्रकल्प व्यवस्थापनाने ग्रामपंचायतीस खुले आश्वासन दिले आहे की कन्या शाळेत पाणी व्यवस्था, टॉयलेट ब्लॉक. पर्यावरण याबाबत प्रकल्प संपूर्णपणे सहकार्य करेल. भूतकाळात तो खर्च केलेला असून भविष्यातही तो करण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की मागच्या वर्षी जेवढी परवानगी आहे, त्यापेक्षा जास्त खर्च सीएसआरमध्ये कंपनीने केलेला आहे. परिसरातील सारी गावे-लखमापूर, किनईपाड्यात आम्ही ट्रॉयलेट ब्लॉक्स बांधून दिले. त्याचे ऑडिटही झालेले आहे. त्यावेळी उपस्थितांनी नाराजीच्या दृष्टीने एकत्रित बोलण्यास सुरवात केली असता प्रकल्प प्रवर्तकांनी सरपंच यांनाच विचारण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी काम केलेल्या गावांची नावे, बील्स व फोटो आहेत हे सांगितले.

त्यावेळी सरपंच यांनी सांगितले की जे शौचालये बांधण्यात आलेली आहेत, हे तीनफळा जामघर, काकडेपाडा जामघर आणि सिपाईदारा

जामघर येथे २१ शौचालये बांधण्यात आलेली आहेत. कातकरीवाडीत बांधलेले आहे.

यावेळी सदस्य यांनी उपस्थितांना शांततेने पर्यावरणविषयक प्रश्नच उपस्थित करण्याचे आवाहन केले. सीएसआर निधी कुठे खर्च करायचा हे प्रकल्प अधिकारी व ग्रामपंचायत ठरवेल असे सांगितले.

११) **श्री विजय बाळू जाधव, सरचिटणीस, श्रमजीवी संघटना महाराष्ट्रः-**

या भागाचा विकास होण्यासाठी स्थानिक शेतक-यांनी त्यांच्या सुपिक जमिनी कवडीमोल भावाने दिल्या. आमचे स्वप्न होते की ग्रामीण भागातील सर्व तरुणांना प्रकल्पात रोजगार मिळेल. उद्योग येथे उभारणे आवश्यक आहे. या कंपनीसहित इतर कंपन्यामध्ये शासनाचा किमान ९०% स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा नियम असतानाही ५% सुध्दा रोजगाराची संधि येथे व इतर कंपन्यांमध्ये स्थानिक तरुणांना मिळालेली नाही. म्हणजे स्थानिकांना फायदा होण्याऐवजी तोटाच झालेला आहे. शिवाय या जयदीप मेटॅलिकसारख्या कंपन्या परिसरात प्रदूषण घेऊन आल्या. आम्हांला जो प्राणवायू मिळतो, तो विषारी प्राणवायु मिळतो. येथे उपस्थितांनी केलेले आक्षेप योग्य आहेत की येथे २-४ लोकांच्या हितासाठीच कंपनी काम करते. तर ९५% लोकांना विषारी वायू पसरविण्याचे काम ह्या कंपन्या करत आहेत. ते वृक्षारोपण केल्याचे सांगतात. ते सर्व खोटे आहे.

त्यांनी आक्षेप नोंदविला की मागच्या वर्षी तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली होती की या कंपनीचे वेस्ट नेरोलीच्या मोरीच्या खाली नेऊन टाकलेले आहे. म्हणजे कंपनीने त्याचे वेस्टवर प्रक्रिया करण्यास सयंत्रणा उभारलेली नाही. येथे लोखंड /इनगोट्स उत्पन्न करणा-या कंपन्या मोठ्या प्रमाणात

पाणी वापरतात. त्यामुळे येथे पाणी टंचाई निर्माण झाली. लोकांना प्यायला पाणी नाही, आजूबाजूस टँकर्स पिण्याचे पाणी घेऊन येतात. म्हणजे येथे पाणी टंचाई वाढली, प्रदूषण वाढले. प्रकल्पापासूनच एक कि.मी. अंतरावर ज्या शाळा आहेत, नियमाप्रमाणे जे इनगोट्स बनविले जाते, त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात उष्णता वाढलेली आहे. त्यामुळे एसी, कुलरची गरज वाढलेली आहे. हा सर्व परिणाम या कंपन्यांमुळे झालेला आहे. येथे वस्तीला लागूनच अभयारण्य आहे. येथे कंपनी उभारणी करताना वन खात्याचे नियम पाळलेले नाहीत. तरी या विनाशकारी कंपन्यांना विस्तारिकरण करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. अन्यथा येथील स्थानिक या कंपन्यांविरुध्द आवाज उठवतील. प्रदूषण थांबविणे, स्थानिकांना रोजगाराबाबत योग्य निर्णय न घेणे जोपर्यंत कंपनी ही कंपनी करत नाही, तोपर्यंत या कंपनीस विस्तारिकरणास परवानगी देण्यात येऊ नये.

सदस्य यांनी उपस्थितांना नवीन काही मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**१२) <u>श्री रंजन रघुनाथ पाटील, राहणार-नेरोली, तालुका-वाडा, जिल्हा-पालघर:-</u>**

बैठकीत असे दिसले की दोन्ही बाजूंनी मुद्दे मांडण्यात येत आहेत. गेल्या ३० वर्षांपासून येथे कंपन्या येण्यास सुरवात झाली. डी झोनची घोषणा झाली व संपूर्ण तालुक्यात कंपन्या आल्या.

यावेळी फक्त पर्यावरणविषयकच मुद्दे उपस्थित करण्याची सूचना पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी केली.

श्री रंजन पाटील यांनी सांगितले की ह्या कंपन्या यायला सुरवात झाली व आम्ही शेतीकडे दुर्लक्ष केले. कंपन्यासाठी प्रदूषणाकडे दुर्लक्ष झाले. कंपन्यांनमुळे

स्थानिकांना रोजगार मिळला यात शंका नाही. तरी कंपन्यांनी प्रदूषण नियंत्रणाचे नियम काटेकोरपणे पाळावेत व नंतरच या कंपन्यांना परवानगी देण्यात यावी. प्रत्येकाचा आरोग्याचा प्रश्न आहे. येथे दोन्ही बाजू दिसल्या. येथे ७०-८०% रोजगार हा या कंपन्यांमुळे मिळाला. कंपन्यांमुळे अप्रत्यक्ष रोजगारात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तरी प्रदूषण नियंत्रण मंडळाने या कंपन्यांना प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळण्यास भाग पाडावे व कंपन्यांना नंतरच परवानगी देण्यात यावी.

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू समिती ही प्रकल्पास मान्यता देत नाही. ही बैठक आपल्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप आहेत, त्या नोंदविण्यासाठीच आहेत. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृत तयार करण्यात येईल व ते मा. अध्यक्ष यांच्या संमतीने म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयामार्फत शासनास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती पुढील निर्णय घेईल. त्यांनी उपस्थितांनी सांगितलेल्या सर्व प्रश्नांची नोंद घेतल्याचे सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप आहेत काय याबाबत विचारणा केली. त्यांनी नवीन मुद्दे काही असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१३) **श्री अजय अतुल घोडे, राहणार-तानसा, तालुका वाडा, जिल्हा. पालघर.**

मी लेखी तक्रार दिलेली आहे. त्याबाबत पर्यावरण सल्लागार यांनी काय केले याची माहिती देण्यात यावी. येथे तानसा अभयारण्य घोषित झालेले आहे. प्रकल्पाचा काही भाग हा तानसा अभयारण्यात, Eco-Sensitive Zone मध्ये आहे. त्यांनी सादरीकरणात ते दर्शविलेले नाही. त्याचप्रमाणे

कंपनीची भट्टी ही १० टन आहे. ती १५ टन करणार आहेत. त्यामुळे परिसरातील तापमानात वाढ होणार आहे.

कंपनीने वनसंपतीचा -हास केलेला आहे. टेकडीवर भरपूर झाडे होती. ती बेकायदेशीर तोडली. त्यासाठी वनखात्याची पूर्वपरवानगी घेतलेली नाही. त्यामुळे कंपनू व्यवस्थापनावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तरी वननियम १९६२ (अ) नुसार प्रकल्प व्यवस्थापनावर कारवाई व्हावा. झाडे तोडली, त्यामुळे पक्षी मेले. तरी संबधित प्रकल्प प्रशासनावर बेकायदेशीर शिकार करण्याचा गुन्हा दाखल करण्यात यावा. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी लेखी मुद्द्यांवर लेखी स्वरुपात उत्तर देण्याचे आश्वासन दिले.

श्री घोडे यांनी पुढे आक्षेप नोंदविला की पर्यावरण सल्लागार यांनी वा-याची दिशा चुकीची दाखविलेली आहे. वारा हा पश्चिमेकडून पुर्वेकडे जातो. तर पर्यावरण सल्लागार यांनी वा-याची दिशा पूर्वेकडून पश्चिमकडे दाखविली आहे. माझी २०० मीटर्सवर १२ एकर शेती असून त्यातील सहा एकर लागवडीची शेती आहे. त्यांनी तेथील नाले दाखविलेले नाहीत. प्रकल्पातील सर्व पाणी माझ्या शेतात येणार. प्रकल्पात राहणारे परप्रांतीय, त्यांनी फेकलेल्या पाण्याच्या बाटल्या व वस्तू माझ्या शेतात वाहून येतात. तेथून चार कि.मी. अंतरावर नदी आहे. तेथे आदीवासी बांधव राहतात. ते मच्छिमारी करतात. जर ते पाणी नदीला गेले, तर मच्छिमारी बंद होईल. प्रकल्पाजवळील शाळा, गावे, पाडे दाखविलेल्या नाहित. त्यांनी चुकीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की येथे आम्ही आपल्या सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्यासाठी

आलेलो आहोत. आपण सादरीकरणातील चुका सांगितल्या. त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. व्हिडिओ शुटिंगसुध्दा घेण्यात येते. बैठकीचे इतिवृत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत व प्राप्त झालेल्या लेखी तक्रारी, सूचना यांच्यासोबत शासनास सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती सर्व बाबी तपासून त्याबाबत निर्णय घेते. सदरहू समिती प्रकल्पाची शिफारस, परवानगी नाकारणे किंवा परवानगी देणे याबाबत नाही. या समितीस तो अधिकार नाही. प्रदूषण नियंत्रणासाठी ज्या उपाययोजना बंधनकारक आहेत, त्याबाबत शासनाकडून निर्देश देण्यात येतात. ही जनसुनावणी प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शी आहे. येथे उपस्थित करण्यात आले की वा-याची दिशा चुकीची दाखविली, शाळेची नोंद घेण्यात आलेली नाही याची इतिवृतात नोंद होते. तरी काही नवीन पर्यावरणीय मुद्दे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. ही अतिशय पारदर्शक व्यवस्था आहे. याचे इतिवृत्त तयार करुन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व प्राप्त झालेल्या लेखी सूचनेसह अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या संमतीने म.प्र.नि.मंडळातर्फे शासनास सादर करण्यात येते. तरी काही नवीन पर्यावरणीय मुद्दे असल्यास ते उपस्थित थोडक्यात करण्यात यावेत. बाकीच्या गोष्टींसाठी जिल्हा प्रशासन आहे.

१४) **श्री चंद्रशेखर, पर्यावरणवादी, हैद्राबादः-**

प्रकल्प विस्तारिकरणासाठी स्थानिकांनी दिलेल्या सूचनांचा विचार व्हावा. स्थानिकांना प्रकल्पात नोकरी देण्यात प्राधान्य देण्यात यावे. सीएसआर निधीचा समाजोपयोगी प्रकल्पासाठी वापर करण्यात यावा. प्रकल्पास पाठिंबा.

१५) **श्री बाळकृष्ण विष्णु भागवत, मुक्काम-डोंगरपाडा, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-**

वारा हा पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतो. प्रकल्पात डोंगरपाडा, किनईपाडा यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. डोंगरपाड्यात अंगणवाड्या आहेत, जिल्हापरिषद शाळा आहेत, त्या दाखविलेल्या नाहित. या कंपनीमुळे मावनीजीवनावर किती दुष्परिणाम होत आहे याचा व्हिडिओ आहे. तो दाखविण्याची परवानगी देण्यात यावी.

१६) **श्री सुरेश भाऊराव पाटील, राहणार-नेरोली, तालुका-वाडा, जिल्हा-पालघरः-**

माझी जमिन लखमापूर गावात आहे. कंपनीकडे पाण्याचे व्यवस्थापन नसते. २०१८ साली जनसुनावणी झाली. त्यातील मुद्दे व आश्वासने यांची कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. तर आजच्या जनसुनावणीतीली आश्वासने, मुद्दे याची अंमलबजावणी होईल काय?

त्याचप्रमाणे हे क्षेत्र पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) आहे. तर सदरहु प्रकल्पास पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (Eco-Sensitive Zone) परवानगी देता येते काय? त्यांनी आक्षेप नोंदविला की वन खात्याची परवानगी ही २०१८ ची आहे. तर आजच्या २०२२ च्या जनसुनावणीसाठी वनखात्याची परवानगी घेतलेली आहे काय? त्यांनी याबाबत आयोजक - म.प्र.नि.मंडळाने स्पष्टीकरण देण्याची मागणी केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) असल्याने ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. यास नवी दिल्ली येथील भारत सरकारचे Eco-Sensitive Zone साठी मंडळ परवानगी देत असते. सदरहू समिती किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रकल्पास परवानगी देत नाही.

कंपनीस भारत सरकारच्या Eco-Sensitive Zone साठी जे मंडळ आहे, त्यास प्रस्ताव सादर करावा लागतो व सर्व बाबींचा विचार करुनच त्यास मंजूरी मिळते. म.प्र.नि. मंडळ परवानगी देत नाही. बैठकीचे इतिवृत्त फक्त पाठविण्यात येते.

श्री सुरेश पाटील यांनी पुढे आक्षेप नोंदविला की प्रकल्पात कच्चा माल आणण्यासाठी व पक्का माल/उत्पादने नेण्यासाठी रोज २५-३० ट्रक्स येणार, त्यासाठी ट्रक यार्ड बनविले आहे काय? त्याबाबत नियोजन देण्यात यावेत. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित व्यक्तीस त्यांचे लेखी आक्षेप देण्यास सांगितले, श्री पाटील यांनी सीआरएस निधी खर्चाबाबत माहिती मिळत नसल्याबाबत आक्षेप नोंदविला. येथील नागरिक प्रकल्पाच त्रास सहन करतात, पण सीएसआर निधी हा दुसरीकडे वापरला जातो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की उपस्थितांना प्रकल्पाच्या बाजूने, विरोधात त्याचप्रमाणे पर्यावरणविषयक चांगले विचार मांडले. आपण मांडलेल्या प्रत्येक मताची नोंद घेण्यात आलेली आहे. ते जशासतसे शासनास सादर करण्यात येते.

बैठकीचा समारोप करताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले. त्यांनी सांगितले की मा. अध्यक्ष यांनी सूचित केल्याप्रमाणे सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इत्तिवृतात समावेश करुन ते इत्तिवृत शासनास सादर करण्यात येईल. तेथील तांत्रिक समिती स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सर्व

सूचनांचा विचार करणार आहे. या प्रकल्पास मान्यता देणे किंवा न देणे याबाबत समिती पुढील निर्णय घेत असते. सदस्य यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्ष याच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले लेखी सूचना/आक्षेप जोडण्यात आलेले आहेत.

**(देविदास कोपरकर)**
आयोजक,
उप प्रादेशिक अधिकारी,
कल्याण-३,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(बाबासाहेब कुकडे)**
सदस्य,
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्याण

**(दिलीप गुट्टे)**
अध्यक्ष,
अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर,
जिल्हा-पालघर